७ मार्च २०१२ ची बातमी. लॉरेन्स अॅन्थनी याची. आफ्रिकेतील "थुला थुला" नावाच्या एका मोठ्या जंगलाचा तो मालक होता. त्याच्या जंगलात हरीण, झेब्रा, हत्ती, चित्ते, ऱ्हायनो असे सर्व प्राणी होते. तो हत्तीशी बोलायचा. हत्तींची शक्ती, बुध्दी व वागणुक याबद्दल त्याचा खूप अभ्यास होता. अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे लॉरेन्स जेंव्हा मेला तेंव्हा रानटी हत्तींचे कळप रांगेत चालत येवून त्याच्या घरासमोर आले. एकूण १३० हत्ती. ते हत्ती काहीही न खाता न पाणी पिता जागच्या जागी शांत दोन दिवस उभे राहिले. त्यांच्या प्रेमळ मित्राला निरोप देण्यासाठी. लॉरेन्स गेला हे त्या हत्तींना कसे कळले?

---

प्रश्न–

१) ही बातमी कोणाची आहे?

२) जंगलात कोणते कोणते प्राणी होते?

३) लॉरेन्सने कोणत्या प्राण्यांचा अभ्यास केला?

४) लॉरेन्स वारला तेंव्हा काय घडले?

५) यावर तुमचे मत सांगा

नमस्कार श्री. केदार सर,
मला तुमच्या क्रिकेटच्या टीम मध्ये भाग घ्यायचा आहे. मला टीम मध्ये नाव घालायला एक आठवडा उशीर झाला. कारण मला गेमला आणणार कोण, सोडणार कोण ते ठरत नव्हते. मला माफ करावे. मला क्रिकेट खूप आवडते आणि खेळ समजतो पण. पहिल्या दिवशी संपूर्ण वर्षाची फी घेवून येवू का? तसे मला इमेल ने कळवावे. मी तुमच्या उत्तराची वाट पहात आहे.
धन्यवाद
आदित्य

---

प्रश्न–
१) वरील उतारा कोणत्या पध्दतीने लिहिला आहे?
२) आदित्यला कशासाठी उशीर झाला?
३) त्याला कोणता खेळ आवडतो?
४) त्याने कसली माफी मागितली व कां?
५) तुमचा असाच एखादा अनुभव सांगा.

अजंठा येथील लेणी जगात प्रसिध्द आहेत. एकविसाव्या लेण्याचे नाव आहे "गंधकुटी". हे लेणे पहायला पुष्कळ वेळ लागतो. दगडांच्या कोरलेल्या मुर्ती आहेत. सगळे दगडी खांब वाटोळे गोल गोल. जिकडे पहाल तिकडे रंगी बेरंगी चित्रांची भरभराट आहे. त्यांचे रंग मनाला आनंद देणारे. हे रंग अजूनही इतक्या शेकडो वर्षानंतर देखील टिकून राहिले आहेत. यातील बहुतेक चित्रे बुध्द आणि त्याचा धर्म "बौध्द धर्म" याविषयाची आहेत. बुध्दाच्या आयुष्यातील या गोष्टींना "जातक कथा" म्हणतात.

---

प्रश्न–

१) अजिंठा कुठे आहे?
२) येथील लेणी व चित्र कशी आहेत ते सांगा.
३) एकविसाव्या लेण्याचे नाव काय आहे?
४) येथील मुर्ती व चित्रे कोणाची आहेत?
५) जातक कथा कशाला म्हणतात?

# पु.ल.देशपांडे

पु.ल.देशपांडे हे मराठीतील श्रेष्ट विनोदी लेखक, नाटककार व बहुरुपी कलावंत म्हणून प्रसिद्ध आहेत. पु.ल.देशपांडे यांचे संपूर्ण नाव पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे असे आहे. त्यांचा जन्म मुंबई येथे इ.स. १९१९ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण मुंबई व पुणे येथे झाले. विनोदांच्या प्रांतात त्यांनी स्वत:चे वेगळे व वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्यांचे 'तुझे आहे तुजपाशी' हे नाटक अतिशय प्रसिद्ध आहे.

पु.ल.देशपांडे यांनी मराठी चित्रपट सृष्टीतही नावलौकिक मिळवला आहे. 'पुढचं पाऊल', 'गुळाचा गणपती' हे त्यांचे गाजलेले चित्रपट. त्यांच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकास साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मानही त्यांना मिळाला होता. भारत सरकारने 'पद्मभूषण 'हा किताब देऊन त्यांच्या गौरव केला. तसेच ते मध्यप्रदेश शासनाकडून दिल्या जाणाऱ्या 'कालिदास सन्मान' चे ही मानकरी ठरले आहेत.

---

**प्रश्न-**

1. पु.ल.देशपांडे हे कोण होते?
2. पु.ल.देशपांडे यांचे पूर्ण नाव काय होते?
3. पु.ल.देशपांडे यांनी काय लिहिले?
4. पु.ल.देशपांडे यांचे कोणते चित्रपट गाजले?
5. पु.ल.देशपांडे यांना कोणते पुरस्कार मिळाले?

---

# वनपिंगळा

जगात सुमारे २०४ जातीची घुबडे सापडतात. यापैकी सुमारे ३८ जाती भारतात सापडतात. वनपिंगळा हा घुबडाच्या जातीतील आहे. भारताच्या बऱ्याचशा भागात घुबडास अशुभ मानतात. पण पूर्व भारतात आणि खास करून पश्चिम बंगालमध्ये यास लक्ष्मीचे वाहन समजतात. घुबडासारखा असला तरी तो फक्त रात्रीच बाहेर पडत नाही. दिवसाही दिसतो.

वनपिंगळा दुर्मिळ पक्षी आहे. वनपिंगळा नष्ट झाला असा समज झाला होता. पण 113 वर्षांनी 1996 मध्ये तो नंदुरबारमध्ये दिसला. सध्या महाराष्ट्रात सातपुड्याच्या पर्वतरांगा, जळगाव, नंदुरबार व मेळघाटमध्ये तो पाहायला मिळतो. पिंगळा आपलं घरटं झाडाच्या ढोलीत करतो आणि वर्षांनुवर्षे तीच ढोली पुन: पुन्हा वापरतो. नर आणि मादी पिंगळा एकमेकांशी प्रेमाने राहतात. मादी जेव्हा अंडी उबवते तेव्हा नर मादीला अन्न पुरवण्याचे काम करतो. पिल्ले झाल्यावर दोघे मिळून पिल्लांना सांभाळतात. पिंगळा सुमारे २० जातीचे प्राणी खातो. त्यात उंदीर, सरडे, पाली, टोळ, नाकतोडे यांचा समावेश आहे.

राखीव जंगलांमधील सागवानाच्या झाडांची बेकायदेशीरपणे होणारी तोड, मेळघाट सारख्या इको पॉइंटमध्ये वनांना आगी

लावण्याचे प्रकार, तसेच तेथे होऊ लागलेली शेती या कारणांमुळे हा पक्षी धोक्यात आहे. तेथील आदिवासींना जागरुक करण्याची गरज आहे. तेथील लोकांना जर इतर रोजगार उपलब्ध करून दिले तर ते वृक्षतोड करून शेती करण्याऐवजी इतर व्यवसाय करतील व या पक्षांचे अस्तित्व टिकेल.

---

प्रश्न-

1. भारतात किती जातींची घुबडे सापडतात?
2. वनपिंगळा महाराष्ट्रात कुठे आढळतो?
3. वनपिंगळा कुठे राहतो?
4. वनपिंगळा काय खातो?
5. वनपिंगळा हा दुर्मिळ आणि धोक्यात कश्यामुळे आहे?

# <u>मुरुड- जंजिरा</u>

रायगड <u>जिल्ह्या</u>तील हा आणखी एक इतिहास प्रसिद्ध किल्ला. हा किल्ला भर समुद्रात बांधण्यात आला आहे. मराठी राज्याच्या इतिहासात या किल्ल्याचे नाव अनेकदा येते. कोकण किनाऱ्याला लागूनच अलिबागच्या दक्षिणेकडे, जवळपास ५० कि.मी. अंतरावर मुरूड हे गाव आहे. या गावाचा परिसर अतिशय <u>निसर्गरम्य</u> आहे. नारळी-पोफळीच्या बागांनी हा गाव हिरवागार आहे. या गावात असलेला इतिहासकालीन राजवाडा `नबावाचा राजवाडा' म्हणून प्रसिद्ध आहे.

मुरूडपासून अवघ्या दोन कि.मी. अंतरावर एका बेटावर जंजिरा किल्ला उभा आहे. मुळातच मुरूडचा समुद्र किनारा अतिशय सुंदर आहे. किनाऱ्यावरून दिसणारा हा भव्य किल्ला तर <u>सौंदर्यात</u> आणखीनच भर टाकतो.

मुरूडचा जंजिरा किल्ला चहू बांजूनी पाण्याने वेढला आहे. या किल्ल्यात जाण्यासाठी नावेने प्रवास करावा लागतो. पीर पंचायतन, सुरूलखानाचा वाडा, किल्ल्याची भक्कम <u>तटबंदी</u> आणि या तटबंदीवर उभारण्यात आलेले अनेक भक्कम बुरूज आजही काळाशी टक्कर देत आहेत. किल्ल्यातील या बुरूजावरून बसविलेल्या काही तोफा इतिहासाची <u>साक्ष</u> देत आहेत.

३५० वर्षापूर्वी अहमदनगरचा राजा मलिक अंबरने या अभेद्य जलदुर्गाची उभारणी केली. कोकण किनाऱ्यावर उभ्या असलेल्या सर्व जलदुर्गात हा किल्ला अतिशय भक्कम आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी तसेच त्यानंतरही मराठ्यांनी हा किल्ला सर करण्याचे अनेकदा प्रयत्न केले, पण ते असफल झाले. या किल्ल्यातील सिद्दी सरदारांनी हा किल्ला सदैव अजिंक्य राखला.

---

प्रश्न-

1. जंजिरा हा किल्ला कुठे बांधला आहे?
2. मुरुड गावाचे वर्णन सांगा.
3. जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी काय करावे लागते?
4. किल्ल्याच्या बुरुजावर काय आहे?
5. जंजिरा हा किल्ला कोणाचा होता?